मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सफाई सेवकांच्या आरोग्याची काळजी घ्या

## अतिरिक्त आयुक्त खोराटे; दोन हजारांहून अधिक सफाई सेवकांची आरोग्य तपासणी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्यात सफाई सेवकांचा मोलाचा वाटा आहे. ते शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार असून त्यांच्या आरोग्य व सुरक्षेची काळजी घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका प्राधान्य देत असते. याच हेतूने आज 'सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'स्वच्छता ही सेवा - २०२५' पंधरवड्यांतर्गत महापालिकेकडून आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली स्वच्छता सेवकांच्या आरोग्य व सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून थेरगाव येथील स्व. शंकरराव गावडे कामगार भवन येथे 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे पुढे म्हणाले, सफाई मित्रांच्या कल्याणासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. त्यांच्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांचा लाभ सफाई सेवकांना मिळावा, यासाठी सातत्याने महापालिकेकडून वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतात. याशिवाय सफाई सेवकांची नियमित वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, यावर देखील भर दिला जात आहे, असेही त्यांनी सांगितले.



### विविध योजनांची माहिती

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने सफाई सेवकांना विविध योजनांचा लाभ व्हावा तसेच त्यांना याची सविस्तर माहिती व मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने माहितीपर स्टॉल देखील यावेळी लावण्यात आला होता. त्यामध्ये महिला व बालकल्याण कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इत्यादी योजनांचा समावेश होता.

याप्रसंगी महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त सचिन पवार, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, थेरगाव रुग्णालयाचे डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. लक्ष्मीकांत अत्रे, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी यांच्यासह महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे, शांताराम माने, राजू साबळे, कुंडलिक दरवडे, महेश आढाव आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये नवीन थेरगाव, तालेरा, आकुर्डी, सांगवी, जिजामाता, यमुनानगर, भोसरी व वायसीएम रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी सफाई सेवकांची तपासणी केली. यामध्ये रक्त तपासणी, ॲनिमिया, हिमोग्लोबिन, हृदयविकार, मधुमेह, कॅल्शियम, हायपरटेन्शन आदींची तपासणी करून मोफत औषध वितरण करण्यात आले. शिबिरात तब्बल २ हजारांहून अधिक सफाई सेवकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सफाई सेवकांना नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले. तसेच महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त सचिन पवार यांनी करताना सांगितले की, सफाई सेवक हा शहराचा कणा आहे. त्यांचे आरोग्य सक्षम ठेवणे ही महापालिकेची जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे यांनी आभार मानले.

---

# आस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर "शस्त्रपूजन सोहळा" रद्द!

## महापूरग्रस्त 50 गावांत मदत करणार; हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनीधी**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वात उंच पूर्णाकृती शिल्प अर्थात "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. नुकतीच शंभूसृष्टीला ऐतिहासिक मानवंदना सोहळा संपन्न झाला. त्याची 'लंडन बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये झाली आहे. येत्या दि. 2 ऑक्टोबर रोजी भव्य-दिव्य शस्त्रपूजन सोहळ्याचे नियोजन केले होते. मात्र, राज्यातील आस्मानी संकटाच्या पार्श्वभूमीवर सदर सोहळा रद्द केला आहे, अशी माहिती हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांनी दिली.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून बोऱ्हाडेवाडी-मोशी येथे सुमारे 7.5 एकर क्षेत्रावर "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" चे काम सुरू आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासन व राज्य शासनाच्या पुढाकाराने आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जागेत ही अभिमानास्पद शंभूसृष्टी आकाराला येत आहे.

गणेश भुजबळ म्हणाले की, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे देव-देश अन् धर्मासाठी केलेले बलिदान, तेजस्वी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचले पाहिजेत. जगभरात आपल्या राजाच्या विचारांची जागृती झाली पाहिजे. राष्ट्रप्रति समर्पण भावनेतून काम करणारी तरुण पिढी तयार झाली पाहिजे. यासाठी हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम, मोहीम हाती घेणार आहोत.



> हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेप्रमाणे आम्ही शस्त्रपूजन सोहळा यावर्षी अत्यंत साधेपणाने करणार आहोत. पुढील वर्षी शस्त्रपूजन सोहळा शाही थाटात करण्यात येईल. आपल्या बळीराजावर आस्मानी संकट ओढावले आहे. त्यामुळे महापूरग्रस्त 50 गावांतील शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी आम्ही लोकसहभागातून मदतकार्य करणार आहोत.
>
> – गणेश भुजबळ, उपाध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.

शंभूसृष्टी आणि "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण"ला ऐतिहासिक मानवंदना सोहळा अत्यंत दिमाखात झाला. संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातील हिंदू बांधवांनी सोशल मीडियावर या सोहळ्याला दाद दिली. त्यानंतर आम्ही विजया दशमी दसऱ्याच्या निमित्ताने दि. 2 ऑक्टोबर रोजी भव्य शस्त्रपूजन सोहळा आयोजित केला होता. हा सोहळा लक्षवेधी होईल आणि शिव-शंभू विचारांचे सोने लुटले जाईल, असा संकल्प होता. मात्र, राज्यात गेल्या काही दिवसांपासून अनेक जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाने झोडपले आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात अक्षरश: ओला दुष्काळ पडला आहे. अनेक संसार उद्ध्वस्त झाले असून, शेतकरी हतबल झाला आहे. अशा परिस्थितीमध्ये शस्त्रपूजन सोहळा रद्द करण्याचा निर्णय ट्रस्टने घेतला आहे, असेही गणेश भुजबळ यांनी सांगितले.

# ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

## नाट्य, साहित्य, कविता, गझल, लोककला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा व महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांच्या सहकार्याने आणि महापालिकेचे श्री भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी व हुतात्मा चाफेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहभागातून ३ ऑक्टोबर २०२५ रोजी “अभिजात मराठी भाषा दिवस” तसेच ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत “अभिजात मराठी भाषा सप्ताह” साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

यानिमित्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय साहित्यिक चर्चा, गझल, अभंग, भजन, कवी संमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथ प्रदर्शन, मराठी चित्रपट कलाकारांशी हितगुज, पोवाडे, बालनाट्य एकांकिका, मराठी वेशभूषा, लोककला कार्यक्रम आणि नाट्यप्रयोग अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचा उद्देश मराठी भाषेची अभिजात परंपरा, तिचे समृद्ध साहित्य व सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा आहे. यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या लोककला, नाट्यप्रयोग, अभिवाचन, गझल गायन, व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेची सखोल ओळख नव्या पिढीला करून देण्याचा प्रयत्न आहे. शालेय विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना या कार्यक्रमांत सहभागी होता येईल, यादृष्टीने सप्ताहातील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिली.

या उपक्रमात मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीतील नामवंत कलाकार, प्रख्यात साहित्यिक, कवी, गायक, व्याख्याते व संशोधक यांचा सहभाग असणार आहे. त्यामुळे नागरिकांना मराठी भाषेच्या विविध अंगांचा आस्वाद घेता येणार आहे. तसेच या निमित्ताने मराठी साहित्य व संस्कृतीचा अभिमान वृद्धिंगत होईल, असा विश्वास महापालिकेचे विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी व्यक्त केला.

**प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे होणारे कार्यक्रम**

दिनांक ३ ऑक्टोबर २०२५

सकाळी ९ वाजता – ग्रंथदिंडी/ शोभायात्रा (मोरया गोसावी मंदिर- गांधी पेठ – चापेकर चौक – प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड)

सकाळी ११ वाजता – उद्घाटन समारंभ

दुपारी २ वाजता – विद्यार्थी व शिक्षकांसाठी बालनाट्य विषयक प्रशिक्षण कार्यशाळा (मार्गदर्शक – प्रकाश पारखी)

सायंकाळी ६ वाजता – लाभले आम्हाला भाग्य (मराठी नाटक)

दिनांक ४ ऑक्टोबर २०२५

सकाळी ९ वाजता – एकांकिका सादरीकरण

दुपारी १२ वाजता – विच्छा माझी पुरी करा (वसंत सबनीस लिखित... राजेश शिंदे दिग्दर्शित...विनोदी मराठी नाटक)

सायंकाळी ५ वाजता – प्राणी आणि गाणी (प्रदीप निफाडकर प्रस्तुत... मराठी गीतांचा कार्यक्रम...)

रात्री ९ वाजता – फोक प्रबोधन ( प्रमोद रणनवरे प्रस्तुत... लोककलेवर आधारित परंपरेचा वारसा उलगडणारा सांस्कृतिक कार्यक्रम)

दिनांक ५ ऑक्टोबर २०२५

सकाळी १० वाजता – गजरा नाट्य छटांचा (मराठी नाटकातील संवाद सादरीकरण)

दुपारी १२ वाजता – प्रिय भाई... (पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रम)

सायंकाळी ५ वाजता – सुंदर मी होणार (मराठी नाटक)

रात्री ९ वाजता – लेखक अरविंद जगताप लिखित पत्रांचे वाचन (सादरकर्ते- सिने अभिनेते सागर कारंडे व सिने अभिनेत्री उर्मिला कानेटकर)

दिनांक ६ ऑक्टोबर २०२५

सकाळी ९ वाजता – स्थानिक कलावंतांच्या गाजलेल्या एकांकिकाचे सादरीकरण

दुपारी १२ वाजता – अलबत्या गलबत्या (मराठी बालनाट्य – खास महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी)

सायंकाळी ५ वाजता – सूर्याची पिल्ले (मराठी नाटक)

रात्री ९ वाजता – राजा हरिश्चंद्र ते हरिश्चंद्राची फॅक्टरी (मराठी चित्रपट गीतांचा संगीतमय प्रवास)

दिनांक ७ ऑक्टोबर २०२५

दुपारी १२ वाजता – लावण्यांचा कार्यक्रम (खास महिलांसाठी)

सायंकाळी ५ वाजता – पत्रा पत्री (सिने अभिनेते दिलीप प्रभावळकर, विजय केंकरे प्रस्तुत नाट्याभिनय)

रात्री ९ वाजता – तुझे आहे तुजपाशी (पु.ल.देशपांडे लिखित अजरामर मराठी नाटक)

दिनांक ८ ऑक्टोबर २०२५

सकाळी १० वाजता – स्थानिक कलावंतांचा नृत्याविष्कार

रात्री ९ वाजता – मराठी बाणा (मराठी संस्कृतीचा अविष्कार असलेला सांस्कृतिक कार्यक्रम)

दिनांक ९ ऑक्टोबर २०२५

दुपारी २ वाजता – संस्कृतीचा लोकरंग – अवघा रंग... संस्कृती रंग (लोकसांस्कृतिक कार्यक्रम)

दुपारी ४ वाजता – अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ

सायंकाळी ५ वाजता – ज्येष्ठ कवी, साहित्यिक रामदास फुटाणे यांचा सत्कार समारंभ

सायंकाळी ७ वाजता – निमंत्रित कवींचे कविसंमेलन (सहभाग – रामदास फुटाणे, विठ्ठल वाघ, नारायण पुरी, प्रशांत मोरे, निलम माणगावे, आबा पाटील, भरत दौंडकर, गुंजन पाटील, प्रशांत केंदळे, अनिल दिक्षीत)

**ग.दि.माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी प्राधिकरण येथे होणारे कार्यक्रम..**

दिनांक ६ ऑक्टोबर २०२५

सायंकाळी ५ वाजता – शाहिरी पोवाड्यांचा कार्यक्रम

दिनांक ७ ऑक्टोबर २०२५

दुपारी १२ वाजता – आज्जी बाई जोरात (मराठी बालनाट्य – खास महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी)

**ग.दि.माडगूळकर छोटे सभागृह, आकुर्डी प्राधिकरण येथे होणारे कार्यक्रम**

दिनांक ७ ऑक्टोबर २०२५

सकाळी ११.३० वाजता – साहित्यिक चर्चा (विषय- मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा प्रवास) (सहभाग – मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे, लक्ष्मीकांत देशमुख, ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे, ज्येष्ठ पत्रकार सुनील माळी)

दुपारी ३ वाजता – मराठी साहित्यातील प्रतिभावंत कथाकारांच्या कथा वाचनाचा कार्यक्रम

सायंकाळी ५ वाजता – कवियित्री इंदिरा संत यांच्या साहित्यावर आधारित अभिवाचन कार्यक्रम

सायंकाळी ६.३० वाजता – कविसंमेलन (सहभाग – स्थानिक कवी)

दिनांक ८ ऑक्टोबर २०२५

दुपारी ३ वाजता – प्रसिद्ध कथाकार जी.ए.कुलकर्णी यांच्या कथांचा दृक श्राव्य आविष्कार

दुपारी ४ वाजता – कुमार करंदीकर यांचा गझल, गीत आणि काव्यसंगीताचा कार्यक्रम

सायंकाळी ५.३० वाजता – मराठी वैभव, मराठी गाणी, नृत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम (सादरकर्ते- केतकी वाडेकर आणि सहकारी)

**कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी येथे होणारे कार्यक्रम**

दिनांक ५ व ६ ऑक्टोबर २०२५

सकाळी १० वाजता – भजन स्पर्धा

दिनांक ८ ऑक्टोबर २०२५

सकाळी १० वाजता – आज्जी बाई जोरात (मराठी बालनाट्य – खास महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी)

**नटसम्राट निळू फुले नाट्यगृह, पिंपळे गुरव**

दिनांक ४ ऑक्टोबर २०२५

सकाळी ९ वाजता – राजा सिंह (मराठी बालनाट्य – खास महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी)

सायंकाळी ५ वाजता – महाराष्ट्राची लोकधारा (मराठी संस्कृतीचे भावविश्व साकारणारा सांस्कृतिक कार्यक्रम)

दिनांक ५ ऑक्टोबर २०२५

सायंकाळी ५ वाजता – अभंगवाणी (पं. सुधाकर चव्हाण प्रस्तुत अभंगांचा कार्यक्रम)

दिनांक ८ ऑक्टोबर २०२५

सायंकाळी ५ वाजता – बहुरूपी भारूड (डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे आणि सहकारी पुणे)

**आचार्य अत्रे रंगमंदिर, पिंपरी**

दिनांक ७ ऑक्टोबर २०२५

दुपारी १२ वाजता – राजा सिंह (मराठी बालनाट्य – खास महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी)

### येथे होणार कार्यक्रम..

» अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित कार्यक्रम चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, आकुर्डी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृह, भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर अशा विविध ठिकाणी होणार आहेत. तरी या कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

## पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील बहुप्रतीक्षित ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील बहुप्रतीक्षित ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच या प्रकल्पावरील प्रकाश यंत्रणेचे आणि उर्वरित तांत्रिक काम पूर्ण करून विविध विभागांमार्फत चाचण्या घेण्यात येणार आहेत. येत्या डिसेंबर महिनाअखेरपर्यंत सर्व परवानग्या आणि प्रक्रिया पूर्ण करून नववर्षाच्या सुरुवातीलाच मिसिंग लिंक खुला करण्यात येणार आहे.

पुणे-मुंबई या दोन शहरातील प्रवासाचा कालावधी द्रुतगती मार्गामुळे (एक्स्प्रेस वे) कमी झाला असताना, आता आणखी एक मोठी झेप घेण्यास सज्ज आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार आहे, तसेच प्रवास अधिक सुरक्षित आणि जलद होणार असल्याची माहिती पुणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) देण्यात आली. ‘एमएसआरडीसी’ने सात वर्षांपूर्वी (मार्च २०१९) सुमारे १३.३ किलोमीटर लांबी असलेल्या, आठ मार्गिकांसह नियंत्रित प्रवेश असलेला मिसिंग लिंक हा प्रकल्प हाती घेतला. परंतु, करोना प्रादुर्भाव, खडकाळ आणि खडतर भूप्रदेश आणि बांधकामाचा विशाल स्तर यामुळे या प्रकल्पाला चार वेळा मुदतवाढ द्यावी लागली. परंतु, आता या प्रकल्पाचे काम ९६ टक्क्यांहून अधिक झाले असून अंतिम टप्प्यात आहे.



प्रकल्पातील भुयारी मार्ग आणि पहिला ‘व्हायाडक्ट’ मार्गाचे काम संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. त्यानुसार भुयारी मार्गात पुरेशी प्रकाश व्यवस्था, सुरक्षितता, वायुविजन, देखरेख यंत्रणा आणि आपत्कालीन, निर्गमन मार्ग यांसारख्या महत्त्वाच्या सुरक्षा तपासण्यांना सुरुवात झाली आहे. याशिवाय, अनिवार्य प्रमाणपत्रे आणि पर्यावरणीय परवानगी मिळवण्याचे कामही प्रगतिपथावर असल्याची माहिती ‘एमएसआरडीसी’चे अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली. ‘हा मार्ग लोणावळा-खंडाळा घाटातील गर्दी आणि अपघातप्रवण भागाला वळसा घालणारा आहे. त्यामुळे प्रवासातील अंतर सुमारे सहा किलोमीटरने वाचणार आहे. तसेच, वाहनांना ताशी १२० किलोमीटर वेग साधता येणे शक्य होणार असून, दोन्ही शहरातील प्रवास सुलभ आणि गतिशील होऊन व्यावसायिक दृष्टिकोनातून अत्यंत फायद्याचा ठरेल,’ असेही वसईकर यांनी नमूद केले.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- » दोन भुयारी मार्ग : एक ९ किलोमीटर आणि दुसरा २ किलोमीटर लांबीचा. – टायगर व्हॅली येथे ‘केबल-स्टेड’ पूल : ६५० मीटर लांबीचा आणि जमिनीपासून १३२ फूट उंचीचा.
- » व्हायाडक्ट : सुमारे १८० मीटर उंचीचा, जो भारतातील सर्वात उंच संरचनांपैकी एक.

### प्रकल्पाचे फायदे

- » प्रवासाचा वेळ आणि वाहतूक कोंडीत घट
- » घाट रस्ते आणि अपघात यातून मुक्तता
- » पश्चिम महाराष्ट्रातील लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट, पर्यटन आणि उद्योगाला चालना

“ शिवाजीनगर- कोंढवा प्रकल्पासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. पुढील तीन महिन्यांत ‘डीपीआर’ तयार करून अंतिम मंजुरीसाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.

**– श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो.**

# घायवळसह कुटुंबियांची बँक खाती गोठविली

## कुटुंबीयांची आणि संबंधित कंपनीची दहा बँक खाती पोलिसांनी गोठवली

**पुणे | प्रतिनिधी**

कोथरूड गोळीबार प्रकरणात कारवाई झालेला गुंड नीलेश घायवळ परदेशात पसार झाल्यानंतर पोलिसांनी घायवळसह त्याच्या कुटुंबीयांच्या आर्थिक नाड्या आवळण्यास सुरुवात केली. घायवळ, त्याचे कुटुंबीय, तसेच त्याच्याशी संबंधित एका कंपनीची दहा बँक खाती पोलिसांनी गोठविली आहे. या बँक खात्यात ३८ लाख २६ हजार रुपयांची रोकड आढळून आली.

कोथरूड गोळीबार प्रकरणात नीलेश घायवळसह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घायवळ, तसेच साथीदारांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली. गोळीबार प्रकरणात मयूर कुंबरे, रोहित आखाडे, गणेश राऊत, मयंक उर्फ मॉन्टी व्यास, आनंद चांदलेकर उर्फ अंड्या, दिनेश फाटक यांना अटक करण्यात आली. गुन्हा दाखल झाल्यानंतर घायवळने बनावट कागदपत्रांच्या आधारे पारपत्र मिळवले. तो स्वित्झर्लंडमध्ये पसार झाला. घायवळला पकडण्यासाठी पुणे पोलिसांनी ‘लूक आऊट’ नोटीस बजाविली आहे.

घायवळ, तसेच त्याच्या कुटुंबीयांचे आर्थिक स्रोत पोलिसांनी तपासण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार घायवळ, त्याच्या कुटुंबीयांची दहा बँक खाती गोठविण्याबाबत




पोलिसांनी बँकेशी पत्रव्यवहार केला. त्यानंतर बँकेकडून नीलेश घायवळ, शुभांगी घायवळ, स्वाती नीलेश घायवळ, कुसुम घायवळ आणि पृथ्वीराज एंटरप्रायझेस ही बँक खाती गोठविण्यात आली आहे. दहा बँक खात्यांतील ३८ लाख २६ हजार रुपये आढळून आले आहेत. पुणे पोलिसांच्या परवानगीशिवाय या बँक खात्यातून व्यवहार करता येणार नाहीत, अशी माहिती गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी दिले.

### आडनावात फेरफार करून पारपत्र?

» नीलेश घायवळने स्वतःच्या आडनावात फेरफार करून पारपत्र मिळविल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. ‘घायवळ’ ऐवजी ‘गायवळ’ असे नाव त्याने पारपत्र मिळवताना वापरले आहे. त्याला पारपत्र मिळवून देण्यासाठी मदत करणाऱ्यांची पोलिसांकडून चौकशी करण्यात येणार आहे.

# येरवडा ते कात्रज बोगदा होणार नाही, महापालिकेची भूमिका!

## खर्च परवडणारा नाही! 'पीएमआरडीए'च्या महत्त्वाकांक्षी बोगदा प्रकल्पाला महापालिकेने 'नाही' म्हटले!

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी येरवडा ते कात्रज हा २० किलोमीटर लांबीच्या बोगद्याचा प्रकल्प प्रस्तावित केला होता. हा बोगद्याचा प्रकल्प व्यवहार्य नसून, खर्चाच्या दृष्टीनेदेखील परवडणारा नसल्याने महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणा'च्या (पुम्टा) बैठकीत या प्रकल्पावर चर्चा झाली. त्यावेळी हा प्रकल्प महापालिकेला करणे शक्य नसल्याचे महापालिका आयुक्त राम यांनी सांगितले. त्यामुळे येरवडा ते कात्रज या बोगद्याची संकल्पना महापालिकेच्या पातळीवर गुंडाळण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

शहराचा उत्तर ते दक्षिण भाग जोडण्यासाठी येरवडा ते कात्रज असा बोगदा तयार करण्याचे नियोजन केले जात होते.

'पीएमआरडीए'च्या ४ हजार ५०३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला मान्यता देताना कात्रज ते येरवडा असा बोगदा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील त्यावेळी या प्रकल्पाला मान्यता देत त्याचा अभ्यास करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या सूचना केल्या होत्या.

या प्रकल्पाचा अहवाल (डीपीआर) तयार करण्यासाठी 'पीएमआरडीए'ने 'मोनार्क' नावाची एजन्सी नेमली आहे. 'पुम्टा'च्या नुकत्याच झालेल्या बैठकीत 'मोनार्क'ने दिलेल्या अहवालातील प्राथमिक बाबींवर चर्चा झाली. त्यामध्ये सुमारे १८ ते २० किलोमीटर लांबीच्या सहा लेनचे दोन बोगदे तयार करावे लागणार आहेत. या कामासाठी सुमारे ७ हजार ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असल्याचे समोर आले. केवळ २० किलोमीटर रस्त्याच्या कामासाठी ७ हजार ५०० कोटी रुपये खर्च हा महापालिकेच्या दृष्टीने मोठा आहे. या रस्त्यावरुन धावणारी वाहनांची संख्या आणि प्रकल्प उभारण्यासाठी होणारा खर्च यामध्ये मोठी तफावत आहे.

महापालिका आयुक्त राम म्हणाले, 'येरवडा ते कात्रज बोगदा तयार करण्याचा प्रकल्प व्यवहार्य नाही. 'पुम्टा'च्या बैठकीतदेखील महापालिकेची भूमिका स्पष्ट करण्यात आली.'



### आमदार रासनेंची संकल्पना कागदावरच?

» शहरातील मध्यवर्ती भागात होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी शनिवारवाडा ते स्वारगेट आणि स्वारगेट ते शनिवारवाडा या दोन मार्गांवर बोगद्यांचा प्रकल्प करण्याचे जाहीर केले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाला (पीडब्ल्यूडी) या कामाचा अहवाल तयार करण्याचे आदेश दिले होते. मात्र हे काम शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने महापालिकेला कळवले आहे. या कामांसाठी अडीच ते तीन हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. महापालिकेला एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करणे अशक्य आहे. त्यामुळे येरवडा ते कात्रज बोगद्याच्या प्रकल्पाप्रमाणेच हे दोन्ही बोगद्यांची संकल्पना कागदावरच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# जालिंदरनगर जि. प. शाळेचे दसऱ्याआधीच सीमोल्लंघन

## टी-फोर एज्युकेशन संस्थेमार्फत दरवर्षी 'वर्ल्ड्स बेस्ट स्कूल प्राइज' ही स्पर्धा आयोजित

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील जालिंदरनगर येथील जिल्हा परिषद शाळेला जागतिक पातळीवरील टी-फोर एज्युकेशन संस्थेमार्फत देण्यात येणारा 'वर्ल्ड्स बेस्ट स्कूल प्राइज' (जगातील सर्वोत्तम शाळा-लोकनियुक्त पसंती पुरस्कार) हा प्रतिष्ठित सन्मान मिळाला आहे.

टी-फोर एज्युकेशन संस्थेमार्फत दरवर्षी 'वर्ल्ड्स बेस्ट स्कूल प्राइज' ही स्पर्धा आयोजित केली जाते. यामध्ये 'लोकसहभागातून शाळा विकास' या विभागात जालिंदरनगर शाळेने सहभाग घेतला होता. जगभरातील लाखो शाळांमधून जालिंदरनगर शाळेची निवड झाली असून तिला 1 कोटी रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. मंगळवारी (दि. 30) उशिरा ऑनलाइन पद्धतीने विजेत्यांची घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे वितरण 15 नोव्हेंबर रोजी अबुधाबी येथे होणार आहे.

हा पुरस्कार शाळेच्या नवकल्पना, सामाजिक प्रभाव आणि विद्यार्थी विकासासाठीच्या योगदानाबद्दल दिला जातो. जगातील सर्वात प्रतिष्ठित पुरस्कार मिळविण्यामागे शिक्षक आणि विद्यार्थी हे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ ठरल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने सांगितले. त्यांच्या गुणवत्तेमुळे शाळेचा तसेच पुणे जिल्ह्याचा नावलौकिक महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता संपूर्ण भारतीय उपखंडात पोहचला आहे.

जालिंदरनगर प्राथमिक शाळेत राबविण्यात आलेल्या सहअध्ययन पद्धतीने शैक्षणिक क्रांतिकारक बदल घडवून आणला आहे. विविध वयोगटातील विद्यार्थी एकमेकांना शिकवतात व शिकतात, ही पद्धत जगभरातील शाळांसाठी प्रेरणादायी आहे, असे शिक्षक दत्तात्रय वारे यांनी सांगितले.



या शाळेत आंतरराष्ट्रीय स्तराचे दर्जेदार शिक्षण दिले जाते. हा निकाल शाळेच्या जागतिक स्तरावर यश मिळवण्याचा आत्मविश्वास वाढवणारा असून सरकारी शिक्षण व्यवस्थेलाही नवा आत्मविश्वास देणारा आहे. शाळा ही लोकसहभागावर आधारित असून, येथे मराठी, हिंदी, इंग्राजीबरोबरच जपानी भाषा शिकवली जाते. पुढील काळात जर्मन भाषा देखील सुरू करण्यात येणार आहे.

> हा पुरस्कार केवळ सन्मान नाही, तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आदर्श आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले आहे. यासाठी सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार
>
> **- गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे**